**सजगता** • मविप्र आणि क्वीक हिल फाउंडेशनचा पुढाकार; ज्येष्ठ नागरिकांशीही साधणार संवाद

# सोशल मीडियावर अपडेशन करताना होणाऱ्या चुका टाळण्यासाठी आता सायबर वॉरियर्स; १० हजार विद्यार्थिनी, महिलांना मार्गदर्शन

प्रतिनिधी | नाशिक

सोशल मीडियाचा अति व बेजबाबदार वापरामुळे अनोळखी व्यक्तींच्या संपर्कात येऊन मुली, मुले व महिला गोपनीय, घरातील माहितीदेखील शेअर करतात, यातून कुटुंबियांना आर्थिक व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते. हे कसे टाळावे व याबद्दल कुठे तक्रार करावी यासाठी क्विक हिल फाउंडेशनकडून केटीएचएम महाविद्यालयातील संगणकशास्त्र शाखेतील पहिल्या व द्वितीय वर्षातील २० विद्यार्थिनींची सायबर वॉरियर्स म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यांचे १२ ग्रुप व त्यांना प्राध्यापक समन्वयक म्हणून असणार आहेत. संस्थेचे सरचिटणीस अॅड. नितीन ठाकरे, प्राचार्य डॉ. आर. डी. दरेकर, समन्वयक सुनीता देवरे यांचे मार्गदर्शन लाभले.




## या उपक्रमात विद्यार्थिनीच करणार विद्यार्थ्यांत जागृती



केटीएचएमच्या संगणकशास्त्र या विभागातील तेजल खराडे, साक्षी जाधव, श्रद्धा मोरे व सुवर्णा वाघमारे यांना क्लब ऑफिसर म्हणून निवडण्यात आले आहे. याच विभागातील १६ विद्यार्थ्यांची सायबर वॉरियर्स म्हणून निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांना २ दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. या विद्यार्थ्यांना १० हजार विद्यार्थ्यांसह नागरिकांमध्ये जनजागृती करण्याचे उद्दिष्ट दिले आहे. - डॉ. राहुल पाटील, संगणकशास्त्र विभागप्रमुख

## सायबर वॉरियर्स देणार प्रशिक्षण

मार्गदर्शन करणारे सायबर वॉरियर्स हे वॉरियर्स संस्थेच्या व इतर शासकीय व खासगी इयत्ता पाचवी ते दहावी आणि कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयात प्रशिक्षण देतील. यात पीपीटीच्या सादरीकरणातून तर काही ठिकाणी पथनाट्यातून नाटिका सादर करून प्रबोधन करणार आहेत. यामध्ये सायबर सिक्युरिटीमध्ये अनोळखी लिंक ओपन करू नये, यूजर नेम व पासवर्ड कोणालाही देऊ नये, ओटीपी कोणालाही देऊ नये, अनोळखी व्यक्तीचा कॉल आल्यास त्याच्याशी नेमके काय आणि किती बोलावे? सोशल मीडियावर विशेषत: फेसबुक, इन्स्ट्राग्रामवर फोटो पोस्ट करताना काळजी घ्यावी. पोर्न फिल्मपासून दूर रहावे, त्या कशा ओळखायच्या, कोणत्याही अनोळखी व्यक्तीशी मैत्री वाढवू नये, त्याची फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नये. आपली जबाबदारी काय? हे सांगण्यात येणार आहे.